RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक ११२] मंगळवार, डिसेंबर २१, २०२१/अग्रहायण ३०, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २१२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय (मुख्य इमारत), ३ रा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ डिसेंबर २०२१

**आदेश**

**भाग-१**

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक संकीर्ण. २०२०/प्र.क्र. २७४/ऊर्जा-४.—विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गतचे कलम १६४ व इंडियन टेलिग्राफ अ‍ॅक्ट, १८८५ अंतर्गतचे कलम १० अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या ४०० के.व्ही. कळवापासून मे. टाटा पॉवर प्रा.लि. यांच्या २२० के.व्ही. सालसेट उपकेंद्रादरम्यान ए.सी.एस.आर. मुज २२० के.व्ही. व्दि-पथ (Double Circuit) पारेषण वाहिनी (पारेषण प्रणालीची सविस्तर योजना सोबत परिशिष्ट-अ मध्ये दिली आहे.) उभारण्यास टेलीग्राफ अ‍ॅक्टमध्ये वर्णन केल्यानुसार या आदेशाद्वारे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

सदर पारेषण वाहिनी उभारणे व संचलन (कन्स्ट्रक्शन अ‍ॅन्ड ऑपरेशन) करण्यास उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. धोरण-२०१६/प्र.क्र.५२०/ऊर्जा-४, दि. ३१ मे, २०१७ मधील तरतुदींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**भाग-२**

विद्युत अधिनियम, २००३ कलम ६८ अन्वये देण्यात आलेल्या परवानगीबाबतच्या समक्रमांकित दि. १५ डिसेंबर २०२१ शासन निर्णय मध्ये काहीही नमूद केलेले असले तरी उपरोक्त नमूद पारेषण वाहिनीची उभारणी, परिरक्षण व संचलन यांना देण्यात आलेली मान्यता विद्युत अधिनियमातील तरतुदी, वीज नियामक आयोग व भारप्रेषण केंद्र यांचे आदेश व नियम जे पारेषण वाहिनीच्या उभारणी व परिरक्षणासाठी असतील, यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**परिशिष्ट-अ**

मे. टाटा पॉवर प्रा. लि., ही कंपनी २२० के.व्ही. सालसेट उपकेंद्र ते ४०० के.व्ही. कळवा, ऐरोली जि. ठाणे, नवी मुंबई या दरम्यान २२० के.व्ही. कळवा-सालसेट-५ (तिसरी वाहिनी) डबल सर्किट (द्वि-पथ) पारेषण वाहिनी उभारीत आहे. सदर वाहिनीचा संक्षिप्त तपशिल पुढीलप्रमाणे आहे :—

१. सदर पारेषण वाहिनी डबल सर्किट (द्वि-पथ) ACSR MOOSE प्रकारची असून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या ४०० के.व्ही. कळवा, ऐरोली, जि. ठाणे, नवी मुंबई ते २२० के.व्ही. सालसेट उपकेंद्र ता. कुर्ला, जि. मुंबई उपनगर या दरम्यान उभारण्यात येणार आहे.

२. सदर वाहिनीची लांबी अंदाजे ९.२ कि.मी. असून पारेषण वाहिनी टाकण्यासाठी अंदाजे २९ मनोऱ्यांची उभारणी करण्यात येईल.

३. सदर २२० के.व्ही. लिलो द्वि-पथ पारेषण वाहिनीचा मार्ग पुढे नमूद केलेल्या गावाच्या/शहराच्या शिवारावरून, बाजूने, सभोवती किंवा दोन गावाच्या मधून जाईल.

| अ. क्र. (१) | गावाचे नाव (२) | तालुका (३) | जिल्हा (४) |
|---|---|---|---|
| १. | ऐरोली | ठाणे | ठाणे |
| २. | मुलुंड | कुर्ला | मुंबई उपनगर |
| ३. | नाहुर | कुर्ला | मुंबई उपनगर |
| ४. | भांडुप | कुर्ला | मुंबई उपनगर |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दिनेश वाघमारे,**
शासनाचे प्रधान सचिव.

**INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Mantralaya (Main Building), 3rd Floor, Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Marg, Mumbai 400 032, date 15th December 2021

*Order*

**Part-I**

ELECTRICITY ACT, 2003.

No. MISC.2020/C.R. 274/Energy-4.—In exercise of the powers conferred by the section 164 of the Electricity Act, 2003 (hereinafter referred to as "Electricity Act") and Section 10 of the Indian Telegraph Act, 1885 (Hereinafter referred to as "The Telegraph Act"), the Government of Maharashtra hereby confers on M/s. Tata Power Pvt. Ltd. the Powers of Telegraph Authority as defined under Telegraph Act, to construct 220 KV Double Circuit Transmission line (Approximately 9.2 KM) from 400 KV Kalwa Sub-Station (Airoli) Dist. Thane to 220 KV Salsette Sub-Station Taluka-Kurla, District-Mumbai Suburban. (As Annexure-1)

The construction and operation of aforesaid 220 KV LILO Transmission line will be subject to provisions of the Government Resolution No. Project-2016/C.R. 520/Energy-4, Dated 31st May, 2017 the Industries, Energy and Labour Deptt., Government of Maharashtra.

**Part-II**

Notwithstanding, anything contained in the approval of the Government of Maharashtra, under section 68 of the Electricity Act, communicated *vide* G.R. of even number dated, 15th December 2021. It is hereby clarified that the construction, maintenance and operation of aforesaid transmission line will be subject to all the provisions of Electricity Act, Orders and Regulations of Maharashtra Electricity Regulatory Commission and orders of Load dispatch Centers, if any, which are applicable to transmission lines, constructed and maintained by generating plants defined under the Electricity Act, 2003.

**Annexure-1**

M/s. Tata Power Pvt. Ltd. is erecting 220 KV Double Circuit transmission line from 220 KV Salsette Sub-Station, Tahasil Kurla, Dist. Mumbai Suburban to Maharashtra State Electricity Transmission Company 400 KV Kalwa Sub–Station Airoli, Navi Mumbai Tahasil and Dist. Thane, to evacuate the power.

In brief, scope of said transmission line is as follow, —

1. The said transmission line shall be Double Circuit type with ACSR MOOSE Conductor and erected from 220 KV Salsette Sub–Station, Tahasil Kurla, Dist. Mumbai Suburban to Maharashtra State Electricity Transmission Company's 400 KV Kalwa Sub–Station Airoli and Navi Mumbai Tahasil and Dist. Thane.

   The approximate length of said transmission line shall be of 9.2 km. and approximately 29 Nos. of towers shall be constructed to erect it.

The said 220 KV Kalwa-Salsette EHV Double Circuit transmission line will pass through, over around and between the following villages of Thane and Mumbai Suburban Districts of Maharashtra State.

| Sr. No. (1) | Name of Village (2) | Tahasil (3) | District (4) |
|---|---|---|---|
| 1. | Airoli | Thane | Thane |
| 2. | Mulund | Kurla | Mumbai-suburban |
| 3. | Nahur | Kurla | Mumbai-suburban |
| 4. | Bhandup | Kurla | Mumbai-suburban |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DINESH WAGHMARE,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE